महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक : १९४(१)(२)(४७)/२१३९/पंधरा-अ** **दिनांक - २० जुलै,२०२१**

## -:प्रसिद्धीपत्रक:-

**विषय:- पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट-अ**

**संदर्भ:- जाहिरात क्रमांक-१३/२०१९**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पशुधन विकास अधिकारी,महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा,गट-अ (जाहिरात क्र.१३/२०१९) संवर्गातील ४३५ पदावरील भरतीकरिता दिनांक २२ डिसेंबर,२०१९ रोजी चाळणी परीक्षा घेण्यात आली आहे.

**२.** दरम्यान,सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल झालेल्या सिव्हिल अपील क्र. ३१२३/२०२० या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.५ मे, २०२१ रोजी दिलेल्या अंतिम आदेशानुसार सदर प्रवर्गाचे आरक्षण रद्दबातल ठरविण्यात आल्यामुळे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी २०२०/प्र. क्र.३२०/१६-ब, दिनांक ५ जुलै, २०२१ अन्वये भरती प्रक्रिया राबविण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरिता आरक्षित असणारी पदे अराखीव पदांमध्ये रूपांतरित करून संबधित चाळणी परीक्षेचा निकाल जाहीर करणे क्रमप्राप्त ठरते.

**३.** प्रस्तुत दिनांक ५ जुलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीच्या आधारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरिता आरक्षित पदे अराखीव पदांमध्ये रूपांतरित केल्यानंतर विषयांकित परीक्षेतून भरावयाच्या पदांचा सुधारित तपशील खालीलप्रमाणे आहे:-

**{उपलब्ध पदसंख्या:- ४३५ (चालू रिक्त पदे ४०२ + ३३ ▼अनुशेष )}**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | आ.दु.घ. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३४ | २१ | ३ | ५ | ५ | ३ | ३ | ८९+३३▼ | ४६ | २०९+३३▼ | १९३ | ४३५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक /समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २२ | १४ | २ | ३ | ३ | २ | २ | ५८+३३▼ | ३० | १३६+३३▼ | १२४ | २६०+३३▼ |
| अ)महिला (३०%) | १०* | ६* | १* | २* | २* | १* | १* | २७* | १४* | ६४* | ५८* | १२२* |
| ब) खेळाडू (५%) | २☑ | १☑ | - | - | - | - | - | ४☑ | २☑ | ९☑ | १०☑ | १९☑ |
| क) अनाथ (१%) | - | - | - | - | - | - | - | - | | - | १# | १# |
| ड) दिव्यांग (३%) | एकूण ४३५ जागांपैकी ०७ जागा चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु (Locomotor Disability or Cerebral Palsy) व ०७ जागा श्रवण शक्तीतील दोष ( Hearing Impairment) या दिव्यांग उपप्रवर्गासाठी आरक्षित असून, दिव्यांग उमेदवार उपलब्ध न झाल्यास दिव्यांगासाठी आरक्षित असलेले पद खुल्या प्रवर्गामधून रिक्त ठेवण्यात येईल. | | | | | | | | | | | |

*** उपलब्ध असल्यास महिलांसाठी आरक्षित** **☑ उपलब्ध असल्यास खेळाडूसाठी आरक्षित**

**▼ अनुशेषाची पदे** **# उपलब्ध असल्यास अनाथासाठी आरक्षित.**

**४.** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**५.** उपरोक्त पदसंख्येच्या आधारे पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट-अ करीता निकाल प्रक्रिया राबविण्यात येईल.

**उप सचिव,सरळसेवा-२**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई**